सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.
Email :- roamravati@dtemaharashtra.gov.in Web :- www.jdroamt.org
Phone :- 0721- 257 3027, 2572577 Fax :- 0721- 257 7913

क्रमांक : विकाअ/शिक्षण/डीबीटी/२०२५/ 2048
दिनांक 17 JUL 2025

**प्रति,**
**प्राचार्य,**
सर्व तांत्रिक शासकीय/अनुदानित/विना अनुदानित पदविका/पदवी व पदव्युत्तर पदवी
अभ्यासक्रमाच्या संस्था,अमरावती विभाग,
अमरावती.

**विषय : व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी मुला-मुलींना शासनाची योजनेच्या लागू असलेल्या लाभाबाबतची अमंलबजावणी शै.वर्ष २०२५-२६**

**संदर्भ :** १.उच्च व तंत्र शिक्षण विभाग,शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/तांशि-४ दि.०७/१०/२०१७
२. उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय क्र.शिष्यवृ-२०२४/प्र.क्र.१०५/तांशि-४, दि.०८/०७/२०२४
३. उच्च व तंत्र शिक्षण विभाग,शासन परिपत्रक क्र.शिष्यवृ-२०२४/प्र.क्र.२०७/तांशि-४, दि.१९/०७/२०२४
४. सामान्य प्रशासन विभाग शा.नि.क्र.संकीर्ण-२०२४/प्र.क्र.७५(भाग-१)/आरक्षण-५ दि.२९/०१/२०२५
५. तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई यांचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२५-२६/३८७ दि.१६/०७/२०२५

उपरोक्त संदर्भाधीन शासन निर्णयान्वये, महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील शासकीय,शासन अनुदानित (शासकीय अभिमत विद्यापीठासह), कायम विनाअनुदानित(खाजगी अभिमत विद्यापीठे व स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे वगळून) महाविद्यालये/शासकीय विद्यापीठे/तंत्रनिकेतनामध्ये सुरु असलेल्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत केंद्रीभुत प्रवेश प्रक्रियेव्दारे (Centralized Admission Process-CAP) (व्यवस्थापन कोटयातील/संस्था स्तरावरील प्रवेश वगळून) प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्टया मागासवर्गीय (EBC), आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (EWS), सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्गीय (SEBC) विद्यार्थ्यांपैकी, **"राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना"** अंतर्गत **पात्र असलेल्या मुलांना** ज्या शैक्षणिक अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेत आहेत, त्या अभ्यासक्रमाकरिता आकारण्यात येणारे **शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क रकमेच्या ५० टक्के लाभ** देण्यात येतो.

उपरोक्त संदर्भ क्र.२ च्या शासन निर्णयान्वये, **शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून,पात्र असलेल्या मुलींना** ज्या शैक्षणिक अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेत आहेत, त्या अभ्यासक्रमाकरिता आकारण्यात येणारे **शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क रकमेच्या ५० टक्के लाभाऐवजी शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क रकमेच्या १०० टक्के लाभ** लागू करण्यात आलेला आहे.(इतर मागास वर्ग(OBC) प्रवर्गातील मुलींना इतर बहुजन विकास विभागाकडून लाभ लागू करण्यात आलेला आहे.)

त्या अनुषंगाने या **परिपत्रकाव्दारे असे कळविण्यात येते की,** शासनाकडून लागू करण्यात आलेल्या योजनेच्या लाभाबाबतची प्रभावी अंमलबजावणीसाठी विभागंतर्गत येणाऱ्या सर्व व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्थांनी **खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.**

१. संस्थांनी त्यांच्या संस्थेतील **सर्व मुलींना (EBC/EWS/SEBC/OBC)** उपरोक्त शासन निर्णय क्र.२ अन्वये शासनाकडून दिल्या जाणाऱ्या **शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क यामध्ये १०० टक्के सवलतीबाबत** अवगत करावे. अशा पात्र मुलींकडून शिक्षण शुल्क न घेण्याबाबत निर्देशित करावे.

२. **सर्व मुलांना देखील** शासन निर्णय क्र.१ अन्वये शासनाकडून दिल्या जाणाऱ्या **शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क यामध्ये ५० टक्के सवलती बाबत** अवगत करावे.

३. TFWS अंतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांना **"राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना"** अंतर्गत **शैक्षणिक शुल्काचा लाभ वगळून परीक्षा शुल्काचा लाभ अनुज्ञेय आहे** तसेच, **"डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजनेचा"** लाभ अनुज्ञेय आहे.

४. दि.२९,जानेवारी २०२५ रोजीच्या सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भिय ४ च्या शासन निर्णयान्वये सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास प्रवर्गातील (SEBC) विद्यार्थ्यांसाठी असलेली शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपुर्ती योजनेकरीता उत्पन्नाचा दाखला सादर करण्याची अट रद्द करण्यात आली असून नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. तरी सर्व संस्थांनी,सदर प्रवर्गातील विद्यार्थ्यांना त्याबाबत तात्काळ कळवून त्याप्रमाणे पात्र विद्यार्थ्यांकडून अर्ज भरुन घेण्यात यावे.

५. संस्थांनी, प्रवेशावेळी घेण्यात येणाऱ्या प्रशिक्षण **( Orientation Programme)** कार्यक्रमाच्या वेळी विद्यार्थ्यांसाठी असलेल्या शासनाच्या योजनेची माहिती देण्यात यावी.

६. संदर्भ क्र.३ च्या शासन परिपत्रकान्वये, शासनाच्या योजनेसाठी पात्र असलेल्या उपरोक्त प्रवर्गाच्या मुलां-मुलींकडून शासनाकडून अनुज्ञेय असलेल्या **शिक्षण शुल्काच्या लाभाची रक्कम ही प्रवेशाच्या वेळी भरावी असा आग्रह धरल्यास किंवा मागणी केल्यास** अशा संस्थाविरुध्द कारवाई प्रस्तावित करावी.

७. संस्थांनी उपरोक्त योजनांबाबतची माहिती संस्थेच्या दर्शनी भागातील सूचना फलकावर लावावी तसेच, संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी व योजनेसाठी पात्र असलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांना योजनांबाबतची माहिती निदर्शनास आणून देऊन, संस्थांनी पात्र विद्यार्थ्यांचे जास्तीत जास्त अर्ज (नवीन/नुतनीकरण) प्राप्त होण्यासाठी संस्थास्तरांवर **विशेष मोहिम राबवून,** पात्र विद्यार्थ्यांकडून डीबीटी पोर्टलवर अर्ज भरुन घ्यावेत. जेणेकरुन कोणताही पात्र विद्यार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहाणार नाही.

८. संस्थांनी, संस्थेतील वरीष्ठ प्राध्यापकांची, शासनाची शिष्यवृत्ती योजनेची अंमलबजावणी दरम्यान विद्यार्थ्यांच्या तक्रारीचे निराकरण करणेसाठी नियुक्ती करावी.

९. विद्यार्थ्यांकडून योजनेच्या लाभासाठी डीबीटी पोर्टलवर भरण्यात आलेले परंतु संस्थांनी, विद्यार्थ्यांना परत पाठविलेले अर्जाबाबत (Sent back अंतर्गत) संस्थांनी **पात्र विद्यार्थ्यांना** तात्काळ बोलवून अर्जाची त्रृटी दूर करुन, अर्ज संबंधित योजनेच्या अर्ज भरण्याच्या अंतिम मुदतीच्या आत पुन:च्छ जमा करण्याबाबत कळविण्यात यावे जेणेकरुन कोणताही पात्र विद्यार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहाणार नाही, तसेच, जर संस्थेकडून **अपात्र विद्यार्थ्यांचे** अर्ज नामंजूर न करता Sent Back करण्यात आले असतील तर अशा विद्यार्थ्यांना सदर अर्ज विद्यार्थ्यांच्या लॉगीनव्दारे रद्द (Cancel) करण्याबाबत कळविण्यात यावे किंवा असे अर्ज विद्यार्थ्यांकडून संस्थेच्या लॉगीनमध्ये प्राप्त करुन घेऊन संस्था स्तरांवर कारणासह नामंजूर करावे. जेणेकरुन एकही अर्ज प्रलंबित राहाणार नाही.

१०. विद्यार्थी केंद्र शासनाच्या (NSP Portal) व महाराष्ट्र शासनाच्या (DBT) पोर्टलवरील शिष्यवृत्ती योजनांपैकी कोणत्याही एकाच योजनेचा लाभार्थी असेल याबाबतची संस्था प्रमुखांनी स्वत: योग्य ती दक्षता घ्यावी आणि जर संस्थांनी, विद्यार्थ्यांला **शासनाच्या एकापेक्षा जास्त शिष्यवृत्ती योजनेचा लाभासाठी अर्ज मंजूर केल्यास** तर त्या संबंधित संस्था प्रमुखांवर कारवाई करण्यात येईल याची संस्था प्रमुखांनी नोंद घ्यावी.

तसेच, तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत येणाऱ्या व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्थांनी विद्यार्थ्यांसाठी लागू असलेल्या शासनाच्या योजनांसाठी संबंधित प्रत्येक संस्थेतील वरीष्ठ प्राध्यापकांची **"संस्था समन्वय अधिकारी"** यांची नेमणूक करावी. व सदर **संस्था समन्वय अधिकारी** यांची माहिती खालील प्रपत्रात भरुन तात्काळ विभागीय कार्यालयास सादर करावी.

| **संस्था समन्वय अधिकारी यांची माहिती:** | | | | | **प्रपत्र -३** | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| विभागीय कार्यालयाचे नाव : | | | | | | | | |
| संस्थेची माहिती | | | | | संस्था समन्वय अधिकारी यांची माहिती | | | |
| अ.क्र. | डीटीई कोड | AISHE Code (असेल तर) | संस्थेचे नाव | जिल्हा | नाव | मोबाईल नंबर | कार्यालयीन दुरध्वनी क्र. | कार्यालयीन ईमेल आयडी |

**(मनोज म.अंधारे)**
**प्र.सहसंचालक**
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती.

**प्रत:**

१. **मा.संचालक,** तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.
२. **प्रोग्रामर,** तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय अमरावती यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४८६ /४८७

ई-मेल § desk१८@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

**तात्काळ :: स्पीड पोस्ट / ई-मेलद्वारे** क्र.:- १८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२५-२६/ ३८८

**महत्त्वाचे परिपत्रक** दि :-१८/०७ /२०२५

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई/पुणे/नाशिक/छत्रपती संभाजीनगर/ अमरावती/ नागपूर.

विषय: व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी मुला - मुलींना शासनाची योजनेच्या लागू असलेल्या लाभाबाबतची अमंलबजावणी.. शै. वर्ष २०२५-२६

संदर्भ : १. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/तांशि-४, दि.०७/१०/२०१७.
२. उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय क्र.शिष्यवृ-२०२४/प्र.क्र.१०५/तांशि-४, दि.०८/०७/२०२४.
३.उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन परिपत्रक क्र.शिष्यवृ-२०२४/प्र.क्र.२०७/तांशि-४,दि.१९/०७/२०२४.
४.सामान्य प्रशासन विभाग शा.नि क्र.संकीर्ण-२०२४/प्र.क्र.७५(भाग-१)/आरक्षण-५ दि.२९/०१/२०२५

उपरोक्त संदर्भाधीन शासन निर्णयान्वये,महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील शासकीय,शासन अनुदानित (शासकीय अभिमत विद्यापीठासह), कायम विनाअनुदानित (खाजगी अभिमत विद्यापीठे व स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे वगळून) महाविद्यालये /शासकीय विद्यापीठे/ तंत्रनिकेतनामध्ये सुरु असलेल्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (Centralized Admission Process-CAP) (व्यवस्थापन कोटयातील /संस्था स्तरावरील प्रवेश वगळून ) प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्टया मागासवर्गीय (EBC), आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (EWS), सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्गीय (SEBC) विद्यार्थ्यांपैकी, **"राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना"** अंतर्गत पात्र **असलेल्या मुलांना** ज्या शैक्षणिक अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेत आहेत, त्या अभ्यासक्रमाकरिता आकारण्यात येणारे **शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क रकमेच्या ५० टक्के लाभ** देण्यात येतो.

उपरोक्त संदर्भ क्रमांक २ च्या शासन निर्णयान्वये, **शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून, पात्र असलेल्या मुलींना** ज्या शैक्षणिक अभ्यासक्रमामध्ये शिक्षण घेत आहेत, त्या अभ्यासक्रमाकरिता आकारण्यात येणारे **शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क रकमेच्या ५० टक्के लाभाऐवजी शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क रकमेच्या १०० टक्के लाभ** लागू करण्यात आलेला आहे. [इतर मागास वर्ग (OBC) प्रवर्गातील मुलींना इतर बहुजन विकास विभागाकडून लाभ लागू करण्यात आलेला आहे.]

त्या अनुषंगाने या **परिपत्रकाद्वारे असे कळविण्यात येते की**, शासनाकडून लागू करण्यात आलेल्या योजनेच्या लाभाबाबतची प्रभावी अंमलजावणीसाठी विभागीय कार्यालयानी त्यांच्या विभागांतर्गत येणाऱ्या सर्व व्यावसायिक

अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्थांना खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत सूचित करावे. तसेच, संस्थांच्या प्राचार्यांसोबत बैठक घेऊन विद्यार्थ्यांना शासनाच्या लागू असलेल्या योजनाबाबत अवगत करावे.

१. संस्थांनी त्यांच्या संस्थेतील सर्व मुलींना ( EBC / EWS/ SEBC / OBC ) उपरोक्त शासन निर्णय क्र. २ अन्वये शासनाकडून दिल्या जाणाऱ्या **शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क यामध्ये १०० टक्के सवलती बाबत** अवगत करावे.अशा पात्र मुलींकडून शिक्षण शुल्क न घेण्याबाबत निर्देशित करावे.

२. **सर्व मुलांना देखील** शासन निर्णय क्र. १ अन्वये शासनाकडून दिल्या जाणाऱ्या **शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क यामध्ये ५० टक्के सवलती बाबत** अवगत करावे.

३. TFWS अंतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांना **"राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना"** अंतर्गत **शैक्षणिक शुल्काचा लाभ वगळून परीक्षा शुल्काचा लाभ अनुज्ञेय आहे** तसेच, **"डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजनेचा"** लाभ अनुज्ञेय आहे.

४. दि.२९, जानेवारी २०२५ रोजीच्या सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भीय ४ च्या शासन निर्णयान्वये सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास प्रवर्गातील (SEBC) विद्यार्थ्यांसाठी असलेली शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजनेकरीता उत्पन्नाचा दाखला सादर करण्याची अट रद्द करण्यात आली असून नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. तरी सर्व संस्थांनी, सदर प्रवर्गातील विद्यार्थ्यांना त्याबाबत तात्काळ कळवून त्याप्रमाणे पात्र विद्यार्थ्यांकडून अर्ज भरुन घेण्यात यावे.

५. संस्थांनी, प्रवेशावेळी घेण्यात येणाऱ्या प्रशिक्षण ( Orientation Programme ) कार्यक्रमाच्या वेळी विद्यार्थ्यांसाठी असलेल्या शासनाच्या योजनेची माहिती देण्यात यावी.

६. संदर्भ क्र.३ च्या शासन परिपत्रकान्वये, शासनाच्या योजनेसाठी पात्र असलेल्या उपरोक्त प्रवर्गाच्या मुलां-मुलींकडून शासनाकडून अनुज्ञेय असलेल्या **शिक्षण शुल्काच्या लाभाची रक्कम ही प्रवेशाच्या वेळी भरावी असा आग्रह धरल्यास किंवा मागणी केल्यास** अशा संस्थाविरुध्द कारवाई प्रस्तावित करावी.

७. संस्थांनी उपरोक्त योजनांबाबतची माहिती संस्थेच्या दर्शनी भागातील सूचना फलकावर लावावी तसेच, संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी व योजनेसाठी पात्र असलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांना योजनांबाबतची माहिती निदर्शनास आणून देऊन, संस्थांनी पात्र विद्यार्थ्यांचे जास्तीत ज़ास्त अर्ज (नवीन / नुतनीकरण) प्राप्त होण्यासाठी संस्थास्तरांवर **विशेष मोहिम राबवून**, पात्र विद्यार्थ्यांकडून डीबीटी पोर्टलवर अर्ज भरुन घ्यावेत. जेणेकरुन कोणताही पात्र विद्यार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहाणार नाही.

८. संस्थांनी, संस्थेतील वरीष्ठ प्राध्यापकांची, शासनाची शिष्यवृत्ती योजनेची अंमलबजावणी दरम्यान विद्यार्थ्यांच्या तक्रारीचे निराकरण करणेसाठी नियुक्ती करावी.

९. विद्यार्थ्यांकडून योजनेच्या लाभासाठी डीबीटी पोर्टलवर भरण्यात आलेले परंतु संस्थांनी, विद्यार्थ्यांना परत पाठविलेले अर्जाबाबत ( Sent back अंतर्गत )- संस्थांनी **पात्र विद्यार्थ्यांना** तात्काळ बोलवून अर्जाची त्रुटी दूर करुन, अर्ज संबंधित योजनेच्या अर्ज भरण्याच्या अंतिम मुदतीच्या आत पुनःश्च जमा करण्याबाबत कळविण्यात यावे जेणेकरुन कोणताही पात्र विद्यार्थी योजनेच्या लाभापासून वंचित राहाणार नाही. तसेच, जर संस्थेकडून **अपात्र विद्यार्थ्यांचे** अर्ज नामंजूर न करता Sent Back करण्यात आले असतील तर अशा विद्यार्थ्यांना सदर अर्ज विद्यार्थ्यांच्या लॉगीनद्वारे रद्द ( Cancel )करण्याबाबत कळविण्यात यावे किंवा असे अर्ज विद्यार्थ्यांकडून संस्थेच्या लॉगीनमध्ये प्राप्त करुन घेऊन संस्था स्तरांवर कारणासह नामंजूर करावे. जेणेकरुन एकही अर्ज प्रलंबित राहाणार नाही.

१०. विद्यार्थी केंद्र शासनाच्या ( NSP Portal ) व महाराष्ट्र शासनाच्या ( DBT Portal ) पोर्टलवरील शिष्यवृत्ती योजनांपैकी कोणत्याही एकाच योजनेचा लाभार्थी असेल याबाबतची संस्था प्रमुखांनी स्वत: योग्य ती दक्षता घ्यावी आणि जर संस्थांनी, विद्यार्थ्याला **शासनाच्या एकापेक्षा जास्त शिष्यवृत्ती योजनेचा लाभासाठी अर्ज मंजूर केल्यास** तर त्या संबंधित संस्था प्रमुखांवर कारवाई करण्यात येईल याची संस्था प्रमुखांनी नोंद घ्यावी.

तसेच, सर्व सहसंचालक, विभागीय कार्यालये यांना उपरोक्त विषयांच्या अनुषंगाने निर्देश देण्यात येत आहे की, त्यांनी त्यांच्या स्तरांवरुन तक्रारींचे निराकरण जलदगतीने करण्यासाठी खालीलप्रमाणे Whats app ग्रुप बनविण्यात यावे व त्याबाबतची माहिती खालील प्रपत्रामध्ये भरुन लवकरात लवकर ईमेलद्वारे सॉफ्टकॉपी सादर करावी.

१. विभागीय कार्यालयांनी विभागीय स्तरांवर, विद्यार्थ्यांसाठी लागू असलेल्या शासनाच्या योजनांसाठी **"विभागीय समन्वय अधिकारी"** यांची नेमणूक करावी. ( **"राज्य समन्वय अधिकारी"** कडून **"राज्य समन्वय अधिकारी"** सोबत **"विभागीय समन्वय अधिकारी"** चा Whats app ग्रुप बनविण्यात येईल. )

२. विभागीय कार्यालयांनी त्यांच्या अखत्यारित येणाऱ्या प्रत्येक जिल्ह्यामध्ये विद्यार्थ्यांसाठी लागू असलेल्या शासनाच्या योजनांसाठी संबंधित जिल्ह्यामध्ये असलेल्या एका शासकीय संस्थातील **"जिल्हा समन्वय अधिकारी"** यांची नेमणूक करावी व **"विभागीय समन्वय अधिकारी" यांनी "जिल्हा समन्वय अधिकारी"** सोबत Whats app ग्रुप बनविण्यात यावा.

३. तसेच, जिल्ह्यामध्ये तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत येणाऱ्या व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्थांनी विद्यार्थ्यांसाठी लागू असलेल्या शासनाच्या योजनांसाठी संबंधित प्रत्येक संस्थेतील वरीष्ठ प्राध्यापकांची **"संस्था समन्वय अधिकारी"** यांची नेमणूक करावी व **"जिल्हा समन्वय अधिकारी" यांनी "संस्था समन्वय अधिकारी"** सोबत Whats app ग्रुप बनविण्यात यावा. (Whats app ग्रुप मध्ये विभागीय कार्यालयांतर्गत येणाऱ्या व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणाऱ्या प्रत्येक संस्थेचा **"संस्था समन्वय अधिकारी"** यांचा समावेश असेल याची खात्री करावी.)

वरील Whats app ग्रुपद्वारे, योजनेसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांकडून उपरोक्त प्रवर्गाच्या मुलां -मुलींकडून शासनाकडून अनुज्ञेय असलेल्या शिक्षण शुल्काच्या लाभाची रक्कम भरण्यास सक्ती करणाऱ्या संस्थाबाबतच्या तक्रारी व योजने संबंधित अन्य तक्रारी **"विभागीय समन्वय अधिकारी"** यांनी **जिल्हा समन्वय अधिकारी** व **जिल्हा समन्वय अधिकारी** यांनी **संस्था समन्वय अधिकारी** ना अवगत करुन तक्रारींबाबतचे निराकरण जलदगतीने करण्यात यावे. जेणेकरुन वरीष्ठ कार्यालयाला तक्रारी प्राप्त होणार नाहीत.

( डॉ. विनोद म. मोहितकर )
संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई.

प्रत- मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ४ था मजला, मुंबई-३२ यांना माहितीसाठी.

**"विभागीय समन्वय अधिकारी" यांची माहिती:** प्रपत्र-१

विभागीय कार्यालयाचे नाव-

| अ.क्र. | विभागीय समन्वय अधिकारी यांची माहिती | | | |
|---|---|---|---|---|
| | नाव | मोबाईल नंबर | कार्यालयीन दूरध्वनी क्र. | कार्यालयीन ईमेल आयडी |
| | | | | |

**"जिल्हा समन्वय अधिकारी" यांची माहिती:** प्रपत्र-२

विभागीय कार्यालयाचे नाव-

**जिल्हा समन्वय अधिकारी यांची माहिती**

| अ.क्र. | जिल्हा | नाव | मोबाईल नंबर | कार्यालयीन दूरध्वनी क्र. | कार्यालयीन ईमेल आयडी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

**"संस्था समन्वय अधिकारी" यांची माहिती:** प्रपत्र-३

विभागीय कार्यालयाचे नाव-

| संस्थेची माहिती | | | | | संस्था समन्वय अधिकारी यांची माहिती | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | डीटीई कोड | AISHECode (असं तर ) | संस्थेचे नाव | जिल्हा | नाव | मोबाईल नंबर | कार्यालयीन दूरध्वनी क्र. | कार्यालयीन ईमेल आयडी |
| | | | | | | | | |

3. Removal of Previous Allotment Restriction:

- The prior system required approval of the earlier application before proceeding to the New Year application.
- Now, students can simultaneously apply for both academic years without waiting for departmental approval of the previous year's form.

The Fee approval process for the new academic year 2025-26 will be commenced from 16th June 2025. Application acceptance for the new academic year 2025-26 will be commenced from 30th June 2025.

The application acceptance portal will be temporarily closed from **26th June 2025 at 6:00 PM** to **29th June 2025 at 11:59 PM**. This temporary closure is necessary to prepare for the commencement of application acceptance for the **academic year 2025–26** and implement the above mentioned changes as well as carry out portal feasibility checks.

Kindly revert in case of any query.

Regards

Abhijit Deole